८९३५ 2007

<u>रोजगार मेळावे आयोजित करण्याबाबत.....</u>

**महाराष्ट्र शासन**
रोजगार व स्वयंरोजगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ जून, २००७.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग,
क्र.धोरण-२०००/प्र.क्र. १५८/रोस्वरो-१, दि. ६ ऑक्टोबर, २०००.

**प्रस्तावना :**

शासनाच्या स्वयंरोजगाराच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते, कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रित रोजगार मेळावे ठाणे व पुणे येथे **प्रायोगिक तत्वावर** घेण्यात आले होते. लघु व मध्यम उद्योजक, दुकानदार, कारखाने मालक, हॉटेल व्यावसायिक यांना कुशल कर्मचा-यांची सातत्याने गरज भासते. अशा नियोक्त्यांना सदर मेळाव्यांमध्ये कुशल कर्मचारी तात्काळ उपलब्ध होतात. ठाणे येथील मेळाव्यात २१ उद्योजक २५२२ पदांसह उपस्थित होते. सदर मेळाव्यात सुमारे ११०० उमेदवारांनी भाग घेतला असून ३२७ उमेदवारांची नोकरीसाठी निवड करण्यात आली. पुणे येथील मेळाव्यात ३२ उद्योजक २२३२ पदांसह उपस्थित होते. सदर मेळाव्यात सुमारे १९३२ उमेदवारांच्या मुलाखती घेवून १७७ उमेदवारांची नोकरीसाठी निवड करण्यात आली. या मेळाव्यांना मिळालेला प्रतिसाद व त्यांची उपयुक्तता लक्षात घेऊन असे मेळावे राज्यात नियमितपणे आयोजित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.-

**शासन निर्णय :**

ठाणे व पुणे येथे प्रायोगिक तत्वावर घेण्यात आलेल्या मेळाव्यांना मिळालेला प्रतिसाद व त्यांची उपयुक्तता लक्षात घेऊन असे **रोजगार मेळावे** १) मुंबई, २) ठाणे, ३) कल्याण, ४) पनवेल, ५) पुणे, ६) पिंपरी चिंचवड, ७) सातारा, ८) महाबळेश्वर, ९) सोलापूर, १०) कोल्हापूर, ११) औरंगाबाद, १२) नांदेड, १३) लातूर, १४) नागपूर व १५) अमरावती इ. ठिकाणी नियमितपणे आयोजित करण्यात यावेत.

२. वर्षभरात या प्रत्येक ठिकाणी किमान चार मेळावे आयोजित करण्यास व त्यावर प्रति मेळावा खालीलप्रमाणे कमाल खर्च करण्यास याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशिल | अपेक्षित कमाल खर्च (रुपये) |
|---|---|---|
| १ | मेळाव्यासाठी बंदिस्त दालन (हॉल) व त्यातील सुविधा त्याचे भाडे (फलक, पार्टीशन, खुर्च्या, टेबले, ध्वनिक्षेपक इ.) | ८,००० |
| २ | कार्यक्रमपत्रिका छपाई, हॅन्ड बिल्स, भित्तीपत्रके, फलक, बॅनर्स, छायाचित्रण इ. (पब्लिसीटी साहित्य) | ५,००० |
| ३ | बेरोजगार उमेदवार व उद्योजकांना पाठविण्यात येणा-या पत्रांसाठी टपाल खर्च | १०,००० |
| ४ | कार्यालयात लागणारी स्टेशनरी इ. | ३००० |
| ५ | भाडयाचे वाहनाचा खर्च/प्रवास खर्च | ४००० |
| ६ | अल्पोपहार स्वागत, इ. खर्च | २००० |
| ७ | तज्ञांना देण्यात येणारे मानधन | ३००० |
| ८ | इतर आकस्मिक खर्च | २००० |
| ९ | एकूण खर्च | ३७००० |

३. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई हे वरील बाबींवरील खर्चामध्ये आवश्यकतेनुसार एकूण खर्चाच्या मर्यादेत फेरबदल करू शकतील. या रोजगार मेळाव्यांसाठी शक्यतो शासकीय/ निमशासकीय विभागांचे सभागृह मिळविण्यात यावे जेणे करून हॉलच्या भाडयाचा खर्च वाचू शकेल. तसेच काही खर्च स्पॉन्सर पध्दतीने करण्यात यावा.

४. सदर मेळाव्यांवर होणारा खर्च हा मागणी क्र.झेडए-१, २२३० कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगारविषयक सेवा (२२३०११०७), ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.८२४/०६/व्यय-६, दि.२५.१.२००७ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०६२९१५४८२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि.रा.शिरसाट)
शासनाचे उप सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,